Copy



गावठाण विस्तार योजना - अेम्.अेन्.जी.४

दुतगतीने कार्यान्वित करण्या संबंधी -

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक अेल् अेन् जी/ १०७६/१६५६५५-र१२
सचिवालय, मुंबई - ३२.
दिनांक ६ सप्टेंबर १९७६.

-परिपत्रक-

गावठाण विस्तार योजनेमध्ये खालील तीन उपयोजनांचा समावेश होतो.

१) लोकसंख्यावाढीमुळे गावठाण विस्तार.

२) भटक्या जमाती विमोचन जमाती व मागासलेल्या वर्गातील व्यक्तींचे वसन

३) पूरग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन.

२. ही योजना कार्यान्वित करत असताना शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, गावठाणवाढीची प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत.

गावठाणवाढीचा प्रस्ताव / मागणी प्राप्त झाल्यानंतर अथवा अेखादे गांव गावठाण योजनेमध्ये समाविष्ठ केल्या नंतर प्राथमिक चौकशी करावी लागते. कित्येक प्रकरणांत प्राथमिक चौकशी होण्यासच विलंब (कांही प्रकरणांत वर्षा पेक्षा जास्त कालावधी) लागतो. ज्या ठिकाणी गावकऱ्यांमध्ये अेकमत होत नसेल त्या ठिकाणी जागेची निवड करण्यास थोडा कालावधी लागणे अपरिहार्य आहे. तथापि इतर प्रकरणांत जागेची निवड तात्काळ व्हावयास हवी. तरी प्रकरणांत प्राथमिक चौकशीच्या स्थरावर विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, सरकारी जमीनीची निवड झाल्यानंतर प्लॉट पाडून वाटप करण्याच्या कार्यवाहीमध्ये दिरंगाई होते. अशा प्रकरणांतील दिरंगाई सहज टाळण्यासारखी असल्याने त्यात तात्काळ कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यांत यावी.

४. ज्या ठिकाणी खाजगी जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे त्या प्रकरणांत फारच दिरंगाई होते. ज्या प्रकरणांत कोर्टाने अथवा शासनाने स्थगिती हुकूम दिलेले आहेत ती प्रकरणे सोडल्यास इतर प्रकरणांत वर्षानुवर्षे कार्यवाही चालू असते. कांही प्रकरणांत दहा-वीस वर्षे अशा प्रकारची कार्यवाही चालू आहे. काही प्रकरणांत सुरवातीला गैरसोयीची जागा निवडल्याने भू-संपादन कायद्याच्या खाली कार्यवाही पूर्ण झाल्यावरही ती प्रकरणे रद्द करुन दुसरी सोईची जागा निवडावी लागली. भूसंपादन कार्यवाही द्रुत गतीने करण्यासंबंधीच्या सूचना शासनाने वेळोवेळी काढल्या आहेत. तरी जिल्हाधिकाऱ्यांनी व संबंधीत अधिकाऱ्यांनी गावठाणवाढीची भूसंपादनाची प्रकरणे विशेष लक्ष देऊन तात्काळ निकालात काढण्याची दक्षता घ्यावी. विशेषतः सर्वात जुनी प्रकरणे प्राधान्य देऊन निकालात काढावीत.

..२-

५. ज्याच गावठाणवाढीच्या प्रकरणांत विधानपरिषदेत अथवा विधान सभेत प्रश्नोत्तराच्या वेळी "कार्यवाही लवकर /तातडीने पूर्ण करुन प्लॉट वाटप करण्यांत येईल" अशा प्रकारचा आश्वासने दिलेली असतात. त्या प्रकरणांत आश्वासन पूर्तीबाबत विलंब होतो ज्या प्रकरणांत अशा प्रकारचे आश्वासन दिले असेल अशा ती प्रकरणे प्राधान्य देऊन जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांनी विनाविलंब पूर्ण करुन अंतीम अहवाल शासनास पाठवावा.

६. विभागीय आयुक्तांना अशी विनंती करण्यांत येते कीं, गावठाण वाढीच्या प्रलंबित प्रकरणांची माहिती गोळा करुन ती जास्तीत जास्त लवकर निकालात काढण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करावे.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मुंबई येथील बैठकीमध्ये खालील प्रमाणे सूचना करण्यांत आली आहे.

"गावठाणाचे क्षेत्र वाढविण्याच्या बाबी वर्षानुवर्षे चालु आहेत. ज्यांची गावठाण जागा घेतल्यामुळे त्यांना दुसरी जागा देणे प्राप्त आहे अशा जागा जिल्हाधिकाऱ्यांनी मामलेदारांनी प्लॉट पाडण्यापूर्वी स्वतः त्या जागा बेघर योजनेमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी देऊन टाकल्या याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. काही बाबतीत जमीन ताब्यात मिळते परंतु प्लॉट पाडण्याचे राहून जाते."

याबाबत जिल्हाधिकारी/यांनी लक्ष देऊन ज्या गावांत गावठाणवाढीसाठी नमूद केलेली जागा ग्रामीण विभागांतील भूमिहीन मजूरांना घरासाठी जागा देणे व त्यावर झोपडया बांधून देणे या योजनेसाठी उपयोगांत आणली असेल अशा गांवी गांवठाणवाढीसाठी आवश्यक ती दुसरी जमीन तावडतोब उपलब्ध करुन देण्यांत यावी. म्हणजे "गावठाणवाढ" या योजने खाली पात्र अशा लोकांनाहि घरासाठी जागा मिळू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

अवर सचिव, महसूल व वन विभाग.

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date......
Recd. 14 ......

सर्व आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा सोडून)